पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.महिला व बालकल्याण समिती

**कार्यपत्रिका क्रमांक १२**

**सभावृत्तांत**

दिनांक : २२/०१/२०१४ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **२२/०१/२०१४** रोजी दुपारी **२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. लोंढे शुभांगी संतोष - सभापती
२) मा. तापकीर अनिता मच्छिंद्र
३) मा. सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
४) मा. पालांडे सुजाता सुनिल
५) मा. नेटके सुमन राजेंद्र
६) मा. गोफणे अनुराधा देविदास
७) मा. थोरात वनिता एकनाथ
८) मा. भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
९) मा. विमलताई सुरेश जगताप

याशिवाय मा.कुलकर्णी – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.ऐवले – प्र.समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे – सहा.प्रकल्प अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) शिलाई मशिन्स वाटप करणेबाबत – मा.अनुराधा गोफणे, मा.प्रतिभा भालेराव यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) ब्युटी केअर मॅनेजमेंट हे प्रशिक्षण घेणा-या महिलांना पार्लर किट देणेबाबत – मा.अनुराधा गोफणे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **०८/०१/२०१४** रोजी झालेल्या सभेचा ( **कार्यपत्रिका क्र.११** ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले</u> -

ठराव क्रमांक – २६ विषय क्रमांक – १

दिनांक – २२/०१/२०१४

सुचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.प्रतिभा भालेराव

संदर्भ:- मा.अनुराधा गोफणे, मा.प्रतिभा भालेराव यांचा प्रस्ताव –

सन २०११-२०१३ या कालावधीत क्लासेस घेण्यात आलेले आहेत. त्यांना नव्याने शिलाई मशिनचे वाटप करण्यात यावे. त्यांच्याकडे शिलाई मशिन अर्जाची मागणी करावी. तसेच पोर्टेबल शिलाई मशिन्स सर्वसोयी उपयुक्त अशा मशिन्स सिंगर ब्रदर्स, उषा, राजेश, नोव्हेल इ. कंपनीच्या मशिन खरेदी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २७ विषय क्रमांक – २

दिनांक – २२/०१/२०१४

सुचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.अनुराधा गोफणे, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव –

ब्युटी केअर मॅनेजमेंट हे प्रशिक्षण शहरातील ब-याच महिला घेतात. या सर्व महिलांना सरावाकरीता पार्लर किट देणेत यावे जेणेकरुन महिलांना प्रशिक्षणातून नवी चेतना, उत्साह मिळेल व महिलांचे सबलीकरणात भर पडेल.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**( लोंढे शुभांगी संतोष )**
**सभापती**
मा.महिला व बाल कल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ९९ /२०१४
दिनांक - २७ / ०१ /२०१४



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.